## जिल्हाधिकारी यांजकडून

जिल्हा पुणे

### *अधिसूचना*

क्रमांक पीएलबी-२/कावि-७१/२०२०.--ज्याअर्थी, समुचित शासन असलेल्या जिल्हाधिकारी, पुणे यांनी भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त अधिनियम" असा केला आहे) यांच्या कलम ११ च्या पोट-कलम *(१)* द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, अधिसूचना क्रमांक उपजि-१/भूसं/कावि-१२३/२०२०/पुणे, दिनांक २४ जून २०२० अन्वये प्रारंभिक अधिसूचना काढली आहे आणि याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, त्यासोबत जोडलेल्या अनुसूची एकमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमिनीची, अनुसूची दोनमध्ये अधिक तपशीलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे ;

आणि ज्याअर्थी, उपविभागीय अधिकारी, मावळ-मुळशी उपविभाग, पुणे यांनी कलम १५ च्या पोट-कलम *(२)* अन्वये दिलेला अहवाल, कोणताही असल्यास, विचारात घेतल्यानंतर, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीन संपादित करण्याची आवश्यकता आहे याबाबत त्यांची खात्री पटली आहे आणि ज्याअर्थी, मुख्य अभियंता, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे तथा संपादन मंडळ यांनी त्यांचे कार्यालयीन पत्र क्रमांक EG/PML-३/प्र. क्र. १२९-ब/६२७/शाखा क्र. १, दिनांक २० नोव्हेंबर २०२० अन्वये उक्त अधिनियमाचे कलम ११ *(१)* अन्वये अधिसूचित करण्यात आलेल्या जमिनींपैकी स. नं. १८७ पैकी २२१३ चौ. मी., स. नं. १९१ मधील संपूर्ण क्षेत्र ८४२ चौ. मी. खाजगी वाटाघाटीद्वारे संपादन मंडळाचे ताब्यात आल्या असल्याने ताब्यात आलेल्या जमिनी संपादनातून वगळण्यात याव्यात, तसेच ग. नं. १९८ मधील संपादनाकरिता अधिसूचित जमिनींचे क्षेत्र हे संपूर्णपणे ओढ्याचे क्षेत्र असलेचे संयुक्त मोजणीअंती निदर्शनास आल्याने सदर ग. नं. १९८ मधील जमीन संपादनातून वगळणेत यावी अशी विनंती केली आहे ; आणि म्हणून उक्त अधिनियमाच्या कलम १९ च्या पोट-कलम *(१)* च्या तरतुदीअन्वये, यासोबत जोडलेल्या अनुसूची एकमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमिनींची अनुसूची दोनमध्ये नमूद उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे, असे याद्वारे घोषित करण्यात येत आहे ;

आणि ज्याअर्थी, अनुसूची तीनमध्ये वर्णन केलेप्रमाणे उक्त सार्वजनिक प्रयोजनामुळे बाधित व्यक्ती विस्थापित होत नाहीत म्हणून पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश अनुसूची चारमध्ये विनिर्दिष्ट केलेला नाही ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड *(छ)* अन्वये, समुचित शासन असलेले जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी श्री. संदेश शिर्के, उपविभागीय अधिकारी, मावळ-मुळशी उपविभाग, पुणे, पत्ता-नवीन प्रशासकीय इमारत, २ रा मजला, विधान भवनसमोर, पुणे-४११ ००१ यांस पदनिर्देशित करीत आहे.

### अनुसूची-एक

### संपादित करावयाच्या जमिनीचे वर्णन

### जिल्हा पुणे, तालुका मुळशी, गाव माण

| अ. क्र. | भूमापन किंवा गट क्रमांक | मोजणीनुसार संपादित क्षेत्र | चतु:सीमा | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | पूर्व | पश्चिम | दक्षिण | उत्तर |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | | चौ. मी. | स. नं. | स. नं. | स. नं. | स. नं. |
| १ | १५४ पैकी | ७२५० (पैकी ५०० कॅनॉल क्षेत्र) | १५४ व १५७ पैकी | १५४ पैकी | १५४ व रस्ता | १५५ व १९८ पैकी |
| २ | १५५ पूर्ण | २८०० | १९५ व १५७ पैकी | १९८ व १५४ पैकी | १५४ | १९५ पैकी |
| ३ | १५७ पैकी | १९५ | १५७ पैकी | १५५ व १५४ पैकी | १५७ पैकी | ओढा |
| ४ | १८६ पैकी | २४५ | १८६ पैकी | १८६ पैकी | १८६ पैकी | १८६ पैकी |
| ५ | १८७ पैकी | १७४१ | १८६ व १८७ पैकी | १८७ पैकी | रस्ता | १८६ पैकी |
| ६ | १८८ पैकी | ९४४१ | १८६ व १८७ पैकी | १८८ पैकी | १९१ पैकी | १८५ पैकी |
| ७ | १९१ पैकी | वगळले | १९१ पैकी | १९१ पैकी | १९१ पैकी | १८७ पैकी |
| ८ | १९४ पैकी | १००४३ | १९४ पैकी | १९६ पैकी | १९४ पैकी | १९१ पैकी |

**अनुसूची-एक--**चालू

**संपादित करावयाच्या जमिनीचे वर्णन**

| अ. क्र. | भूमापन किंवा गट क्रमांक | मोजणीनुसार संपादित क्षेत्र | चतु:सीमा | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | पूर्व | पश्चिम | दक्षिण | उत्तर |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | | चौ. मी. | स. नं. | स. नं. | स. नं. | स. नं. |
| ९ | १९५ पैकी | १८५० (पैकी १६७२ ओढाक्षेत्र) | १९६ व १९५ पैकी | १९७ व १९८ पैकी | १५५ | १९६ पैकी |
| १० | १९६ पैकी | २६५८५ | १९४ व १९६ पैकी | १९६ पैकी | १९५ पैकी | १९१ पैकी |
| ११ | १९८ पैकी | वगळले | १५५ पैकी | १९८ पैकी | १५४ पैकी | १९५ पैकी |
| | **एकूण** | **६०१५०** | | | | |

**अनुसूची - दोन**

**सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण**

**प्रकल्पाचे नाव :** हिंजवडी ते शिवाजीनगर पुणे मेट्रो लाईन-३ या प्रकल्पातील कार डेपो व पोहोच रस्ता.

**प्रकल्पाच्या कामाचे वर्णन :** विशेष सार्वजनिक वाहतुकीचा पायाभूत सुविधा प्रकल्प.

**समाजाला मिळणारे लाभ :** हिंजवडी ते शिवाजीनगर या मार्गावरील सार्वजनिक वाहतूक सुरळीत व जलद गतीने होण्यास मदत होणार आहे.

**अनुसूची-तीन**

**पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन**

**जिल्हा पुणे, तालुका मुळशी, गाव माण**

| अनुक्रमांक | भूमापन क्रमांक किंवा गट नंबर | क्षेत्र (हेक्टरमध्ये) |
|---|---|---|

उक्त सार्वजनिक प्रयोजनामुळे बाधित व्यक्ती विस्थापित होत नाहीत, सबब पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन निरंक असे.

**अनुसूची - चार**

**(पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश)**

**(पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश वर्णन निरंक असे.)**

**टीप.--**:-उक्त जमिनीच्या नकाशाचे उपविभागीय अधिकारी, मावळ-मुळशी उपविभाग, पुणे या कार्यालयाचा पत्ता-नवीन प्रशासकीय इमारत, २ रा मजला, विधान भवनसमोर पुणे- ४११००१ येथे निरीक्षण करता येईल.

**डॉ. राजेश देशमुख,**

जिल्हाधिकारी, पुणे.

पुणे, २४ नोव्हेंबर २०२०.